**ठळक बातम्या**

- २०४७ पर्यंत विकसित व्हायचं असेल तर भारताला आत्मनिर्भर होण्याशिवाय पर्याय नसल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- जीएसटीमधल्या दरकपातींमधल्या त्रुटींविषयी १-९-१-५ या क्रमांकावर तक्रार करता येणार

- एच वन बी व्हिसा शुल्कवाढीचा अमेरिका फेरविचार करेल अशी भारताला आशा, या शुल्कवाढीवर नॅसकॉमकडूनही चिंता व्यक्त

- जेष्ठ अभिनेते मोहनलाल यांना २०२३ या वर्षाचा दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर

आणि

- ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात भारतीय महिला संघाचा डाव गडगडला

**<><><><>**

स्वातंत्र्यप्राप्तीच्या शतकपूर्तीपर्यंत म्हणजे २०४७पर्यंत विकसित व्हायचे असेल तर भारताला आत्मनिर्भर होण्याशिवाय पर्याय नाही, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. गुजरातमधल्या भावनगरमध्ये समुद्र से समृद्धी तक या कार्यक्रमात ते बोलत होते.

**- - होल्ड प्रधानमंत्री बाइट - -**

यावेळी त्यांनी ३२ हजार कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांची पायाभरणी आणि लोकार्पण केलं. त्यात मुंबईतल्या आंतरराष्ट्रीय क्रूज टर्मिनलच्या उद्घाटनाचाही समावेश आहे. सव्वा ४ लाख वर्गफूट क्षेत्रफळावरं उभं राहिलेलं हे देशातलं सर्वात मोठं क्रुझ टर्मिनल आहे. वर्षाला १० लाखांहून अधिक प्रवासी आणि एकाचवेळी ५ क्रुझ इथं उभ्या राहू शकतात. यावेळी ६६ हजार कोटी रुपयांचे २१ सामंजस्य करार झाले. त्यात महाराष्ट्रात मोठं जहाज बांधणी केंद्र उभारण्याच्या कराराचा समावेश आहे.

प्रधानमंत्र्यांनी अहमदाबादजवळच्या लोथल इथल्या राष्ट्रीय सागरी वारसा संकुलाला भेट दिली. कच्छमधे धोरडो हे गाव पूर्णपणे सौर ऊर्जेचा वापर करीत असून त्याचं लोकार्पण प्रधानमंत्र्यांनी केलं.

**<><><><>**

वस्तू आणि सेवा करातले बदल देशातल्या नागरिकांना फायद्याचे ठरावे म्हणून केले आहेत असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितलं. कर पुनर्रचनेत ३७५ वस्तू आणि सेवांवरचा  कर कमी झाला आहे, अशी माहिती त्यांनी दिली. जीएसटी संदर्भातल्या इतर बातम्या ऐकूया आमच्या प्रतिनिधीकडून....

**- - -होल्ड- व्हॉईस कास्ट-**

*(जीएसटीच्या दरांमध्ये केलेल्या कपातीच्या अंमलबजावणीत काही अडचणी आल्या तर ग्राहकांना १९१५ या क्रमांकावर देशातल्या १७ विविध भाषांमधे तक्रार नोंदवण्याची सुविधा उपलब्ध आहे. वाहनं, बँकिंग, ई कॉमर्स, ग्राहकोपयोगी वस्तू आणि उपकरणं अशा विविध वस्तूंवरच्या कर आकारणीसंदर्भातल्या तक्रारी या मदत क्रमांकावर नोंदवता येतील.*

*जीएसटी करपुनर्चनेचा फायदा ग्राहकांपर्यंत पोहचवण्याच्या उद्देशाने रेल्वेने बाटलीबंद पाण्याच्या कमाल विक्री दरात कपात करायचं ठरवलं आहे. त्यानुसार येत्या सोमवारपासून रेलनीरची एक लीटरची बाटली १५ ऐवजी १४ रुपयांना तर अर्धा लीटरची बाटली १० ऐवजी ९ रुपयांना मिळेल.*

*या नवीन कररचनेत घरगुती इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या किमतीत अनेक बदल झाले आहेत. दूरचित्रवाणी संच, एअर कंडिशनर, डिशवॉशर यांसारख्या वस्तुंवरचा कर २८ टक्क्यांवरून १८ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे. या सुधारणांमुळे उपकरणांची मागणी वाढून देशांतर्गत उत्पादकांना बाजारपेठेत वाव मिळेल. तसंच, या उपकरणांसाठी लागणाऱ्या वायरिंग, कूलिंग सिस्टम, एलईडी पॅनेलचे पुरवठादार आणि सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी देखील ही नवी कररचना लाभदायक ठरणार आहे.)*

**<><><><>**

महत्त्वाकांक्षी अहमदाबाद-मुंबई बुलेट ट्रेनचा सूरत ते बिलिमोरा हा पहिला टप्पा २०२७ मध्ये सुरू होईल, अशी माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज दिली. या प्रकल्पाचा ठाण्यापर्यंतचा टप्पा २०२८ पर्यंत, तर वांद्रे-कुर्ला संकुलापर्यंतचा भाग

त्याच्यापुढच्या वर्षी पूर्ण होईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. बुलेट ट्रेन मार्गावरच्या घणसोली ते शीळफाटा यादरम्यानच्या ५ किलोमीटरच्या बोगद्याचं जोडकाम केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या उपस्थितीत आज पूर्ण झालं. या प्रकल्पाच्या प्रगतीबद्दल रेल्वेमंत्री म्हणाले….

**होल्ड… बाईट- वैष्णव**

**<><><><>**

**एच वन बी व्हिसा** शुल्कवाढीमुळे अनेक कुटुंबांवर वाईट परिणाम होणार असून अमेरिकन प्रशासनानं याचा विचार करावा अशी प्रतिक्रिया भारतानं दिली आहे. एच वन बी व्हिसा शुल्क दोन ते पाच हजार अमेरिकन डॉलरवरून वाढवून ते १ लाख डॉलर करण्याचा निर्णय अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नुकताच घेतला आहे. त्यावर परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे. कुशल कामगारांच्या स्थलांतरामुळे तंत्रज्ञान विकास, नवोन्मेष, आर्थिक विकास यांना चालना मिळते. भारत आणि अमेरिका या दोन्ही देशात संपत्ती निर्माणात याचा मोठा वाटा आहे, असंही परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे.

H 1B व्हिसा शुल्कात वाढ करण्याच्या अमेरिकेच्या निर्णयाचा नवोन्मेष परिसंस्था आणि रोजगारावर परिणाम होईल, असं माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रातली प्रमुख संस्था नॅसकॉमने म्हटलं आहे. या निर्णयाच्या अंमलबजावणीच्या वेळेबाबतही नॅसकॉमने चिंता व्यक्त केली आहे. या निर्णयाचा परिणाम एच वन बी व्हिसावर असलेल्या भारतीय नागरिकांवरही होणार आहे.

**शुल्कवाढीच्या** पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय प्रवास न करण्याचं तसंच अमेरिकेत परतण्याचं आवाहन मेटा आणि ॲमेझॉन या कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना केलं आहे. नवीन शुल्क लागू होण्याआधी कर्मचारी अमेरिकेत परतले नाहीत, तर ते तिथेच अडकून पडू शकतात असा इशारा कंपनीने दिला आहे.

**<><><><>**

सेवा आणि सुशासनाच्या मार्गावरून चालताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार देशाच्या सर्व समावेशक प्रगतीसाठी प्रयत्नशील आहे. केंद्र सरकारने वैद्यकीय खर्चासाठी उपयुक्त ठरणारा आरोग्य विमा आणि आयुर्विमा संरक्षण क्षेत्रातही नवनवीन योजना आणल्या आहेत. या योजनांविषयी अधिक माहिती आता ऐकुया…

**होल्ड... कॅप्सूल**

*(आकस्मिक संकटांमुळे असुरक्षित होऊ शकणाऱ्या आर्थिक भविष्याला सुरक्षित करण्यासाठी उपयुक्त ठरणारा विमा सर्वांना परवडणाऱ्या किमतीत मिळावा यासाठी केंद्र सरकारने प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना आणि प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना यांचा समावेश असलेल्या जन सुरक्षा योजना सुरू केल्या. यासंबंधी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले….*

***होल्ड बाईट - प्रधानमंत्री***

*प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेत अपघाती मृत्यू आणि अपघातामुळे मृत्यू किंवा अपंगत्व आल्यास किमान हप्त्यावर दोन लाख रुपयांपर्यंतचा परतावा मिळू शकतो. प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेद्वारे कोणत्याही कारणास्तव मृत्यू झाल्यास किमान हप्त्यावर आर्युविम्याचा परतावा मिळू शकतो. प्रधानमंत्री जन आरोग्य योजना ही पूर्णपणे सरकारद्वारे वित्तपुरवठा होणारी जगातील सर्वात मोठी वैद्यकीय विमा आणि हमी योजना आहे.)*

**<><><>**

मल्याळी जेष्ठ अभिनेते मोहनलाल यांना 2023 या वर्षाचा दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाला आहे. दादासाहेब फाळके पुरस्कार निवड समितीच्या शिफारशीवरुन केंद्र सरकारने हा पुरस्कार जाहीर केला आहे.

प्रख्यात अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते असणाऱ्या मोहनलाल यांची कारकिर्द अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायक आहे. २३ सप्टेंबरला ७१व्या राष्ट्रीय फिल्म पुरस्कार समारंभात त्यांना फाळके पुरस्काराने गौरवण्यात येईल.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मोहनलाल यांचे अभिनंदन केलं आहे. मोहनलाल यांची अभिनयशैली उत्कृष्टता आणि बहुमुखी प्रतिभेचं प्रतीक आहे. आपल्या समृद्ध अभिनयाच्या जोरावर त्यांनी मल्याळम सिनेमा, रंगभूमीची अनेक दशके गाजवली, असं प्रधानमंत्री म्हणाले.

**<><><>**

**ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या** एकदिवसीय क्रिकेट मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात ४१३ धावांचं लक्ष्य गाठताना भारतीय महिला संघाचा डाव गडगडला. दिल्लीत सुरू असलेल्या या सामन्यात ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. बेथ

मुनी हिनं केलेल्या १३८ धावांच्या जोरावर ऑस्ट्रेलियाचा संघ ४१२ धावांमध्ये सर्व बाद झाला. भारताकडून अरुंधती रेड्डीने तीन तर रेणुका सिंगने आणि दिप्ती शर्माने प्रत्येकी दोन बळी घेतले.

त्यानंतर खेळायला आलेल्या भारतीय संघाच्या सलामीच्या २ फलंदाज ८५ धावांच्या आतच तंबूत परतल्या होत्या. सलामीवीर स्मृती मंधना हिनं ५ षटकार आणि १७ चौकारांसह सव्वाशे धावा केल्या. कर्णधार हरमन प्रीत कौर ८ चौकारांसह ५२ धावा करुन बाद झाली.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या ३२ षटकात ६ बाद २७८ धावा झाल्या होत्या.

**<><><><>**

चायना मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीनं पुरुष दुहेरीच्या अंतिम फेरीत धडक मारली. उपांत्य फेरीत त्यांनी मलेशियाच्या जोडीवर २१-१७, २१-१४ अशी सहज मात केली. त्यांचा अंतिम फेरीतला सामना उद्या होणार आहे.

**//<><><><>//**